# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४६४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०१/०८/२०१६.

**१) घरातील सोना— चांदी व नगदी पैशाची चोरी . :—**

दिनांक ३१/०७/२०१६ रोजी ११.०० ते १२.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी विष्णु श्रीराम ठवकर वय ३७ वर्ष रा. खापा हा आपल्या पत्नीसह घराला ताला लावुन शेताचे कामावर गेला असता यातील आरोपीने सुना मौका पाहुन समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करून गोदरेज आलमारी व सुटकेस फोडुन त्यामध्ये ठेवलेले सोण्याचे टॉप्स वजन ४ ग्रॅम, सोण्याची अंगठी वजन ३ ग्रॅम, २ अंगठी वजन ४.५ ग्रॅम, सोण्याचे चंद्रकोर अर्धा ग्रॅम, लॉकेट अर्धा ग्रॅम, १० सोण्याचे मनी, चांदीच्या तोरडया २ जोड, चांदीचा करदोडा व नगदी ५८००/—रू. असा एकुण कि. ३८,८००/—रू. चा माल चोरून नेल्याने असे फिर्यादी यांचे तोडीं रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५४, ३८०, भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. सोनपीपरे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) चहा टपरीच्या दुकानातील सामानाची चोरी . :—**

दिनांक ३०/०७/२०१६ रोजी २२.३० ते ३१/०७/२०१६ चे ०६.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी अशोक भाऊलाल नारनवरे वय ४६ वर्ष, रा. गिरोला याची चाहापाणी नास्ताची लोखंडी दुकानाचे कुलुप तोडुन आत ठेवलेला १ एचपी कंपनीचा गॅस हंडा १९ किलो वजनाचा, ब्रिस्टाल पॉकिट, गोल्ड सिगारेट पॅाकीट असा एकुण ३,१२३/—रू. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कारधा येथुन चोरून नेल्याने असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४६१, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या धडकेत इसमाचा मृत्यु .:—**

दिनांक ३०/०७/२०१६ रोजी १९.३० वा. दर. यातील आरोपीने आपल्या ताब्यातील मोटार सायकल वर ०३ सिट बसवुन भरधाव वेगाने, लापरवाहीने, निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकल पिंपळगाव सडक येथे स्लीप झाल्याने मोटार सायकल सह रोडवर पडुन स्वतः व फिर्यादी नेपाल यास जखमी करण्यास व भाऊ मसराम वय ४० वर्ष, रा. कोसम घाट यांचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे बयान व डॉ मेमो व एमएलसी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७, ३०४(अ) भादवि. सहकलम १८४ मोवाका.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. राऊत पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

४) विवाहीतेचा विनयभंग गेल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ३०/०७/२०१६ रोजी २०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीने आरोपीस तुझ्या स्लापचा पाणी माझे घरात आल्यामुळे दिवाल पडली. असे म्हटले असता आरोपीने भांडण करुन फिर्यादीस अश्लिल व तिच्या मनाला लज्जा पोहचेल अश्या शब्दात बोलुन हाताने इशारा करुन जिवाने मारण्याची धमकी दिली असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ५०९,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

५) अवैध दारू अडयांवर धाडी. :–

दिनांक ०१/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. कारधा, व लाखांदुर येथील परीसरातील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २१ लिटर हातभट्टी दारू तसेच ४ लिटर ५० मिली देशी दारू + १ मो. सा. किमती १०,४५९ /–रु. व जुगारातुन किमंत २,६२५/–रू. असा एकुण कि. १३,०८४/–रू. चा माल जप्त करण्यात आला.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.